कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/कविवि/सूकेकेस्मृसंस/२०२१-२२/२३७३
दि. १२/०१/२०२२

## कृपया प्रसिध्दीसाठी

देशातील नामांकित अशा संगीत समारोहामध्ये गणना होणारा कला अकादमीचा प्रतिष्ठेचा ४१ वा सूरश्री केसरबाई केरकर संगीत समारोह यंदा दि. १४ ,१५ व १६ जानेवारी २०२२ या कालावधीत राजीव गांधी कला मंदिर, फोंडा येथे संपन्न होणार आहे. सदर महोत्सवाचे उद्‌घाटन शुक्रवार दि. १४ जानेवारी रोजी सायं. ५.०० वा. कला अकादमीचे सदस्य सचिव श्री. विनेश आर्लेकर यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

### महोत्सवात सहभागी होणा-या कलाकारांचा संक्षिप्त परिचय

**रितिष्का वेर्णेकर(शांस्त्रीय गायन):-**

रितिष्का वेर्णेकर यांचा जन्म संगीताची परंपरा असलेल्या परिवारात झाला व त्यांनी गायकिचे प्राथमिक धडे त्यांचे वडिल श्री. चंद्रकांत वेर्णेकर यांच्याकडून घेतले व त्यानंतरचे धडे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील प्रशिक्षण डॉ. शशांक मक्तेदार यांच्याकडून घेत आहे. महाराष्ट्र, कर्नाटक तसेच गोव्यात आयोजित होत असलेल्या अनेक प्रतिष्ठेच्या संगीत संमेलनांत त्यांनी मैफली सादर केल्या आहेत.

**पं. दीपक क्षीरसागर(स्लाइड गिटार मैफल):-**

पं. दीपक क्षीरसागर हे दुर्मिळ आणि प्रतिभाशाली संगीतकारांपैकी एक आहेत, जे संगीत क्षेत्रात भारतीय शास्त्रीय गायन आणि गिटार या दोन्हींसाठी तितकेच प्रसिध्द आहेत. त्यांनी आपले आजोबा, ग्वाल्हेर-किराणा घराण्याचे प्रसिध्द गायक, पं. बी.एन. क्षीरसागर आणि पं. सतीश खानवलकर यांच्याकडून संगीताची तालीम घेतली. पं. दीपक क्षीरसागर यांनी तानसेन समारोह, हरवल्लन संगीत समारोह, आकाशवाणी संगीत संमेलन, यांसारख्या अनेक प्रतिष्ठित संगीत संमेलनांमध्ये त्यांनी भारत आणि परदेशात मोठया प्रमाणावर सादरीकरण केले आहे.

**आरती अंकलीकर टिकेकर(शास्त्रीय गायन):-**

प्रख्यात गुरु पद्मविभूषण गानसरस्वती किशोरीताई आमोणकर यांच्या शिष्या असलेल्या आरती अंकलीकर टिकेकर यांची गायकी रसिक श्रोतृजनाना नेहमीच मोहून टाकते. आरती अंकलीकर यांनी आग्रा तसेच ग्वाल्हेर आणि जयपूर-अत्रोली घराण्यात आपले संगीताचे प्रशिक्षण घेतले असून त्या सध्या आजच्या पिढीतील एक आघाडीच्या गायिका म्हणून ओळखल्या जातात. आरती अंकलीकर यांना सर्वोत्कृष्ट महिला गायनासाठी दोन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्राप्त केलेले आहेत.

**धनंजय हेगडे(शास्त्रीय गायन):-**

संगीतमय कुटुंबात जन्मलेला धनंजय हा एक तरुण आणि प्रतिभावान हिंदुस्थानी शास्त्रीय गायक असून त्यानी वयाच्या चौथ्या वर्षी आपल्या आई श्रीमती गीता हेगडे यांच्याकडून संगीताचे प्राथमिक धडे घेतले. धनंजय यांचे वडिल श्री. जी. एस. हेगडे हे प्रसिध्द तबला वादक आहेत आणि “सप्तक” या संगीत संस्थेचे संस्थापक आहेत.

श्री. धनंजय हेगडे यांना केंद्रीय संगीत नाटक अकादमी, नवी दिल्ली यांनी उस्ताद बिस्मिल्ला खान युवा पुरस्काराने सन्मानित केलेले आहे. त्यांना सामापा फाउंडेशन , नवी दिल्ली व्दारे २०१४ साठी “सा. मा. पा. राष्ट्रीय युवा रत्न सन्मान प्रदान करण्यात आला असून कर्नाटक सरकारने स्वरसम्राट पं. बसवराज राजगुरु युवा पुरस्कार २०१६ ने सन्मानित केले आहे.

**शाकिर खान(सतार वादन):-**

सतार वादनातील प्रख्यात गुरु उस्ताद शाहिद परवेझ खान यांचे सुपुत्र आणि शिष्य असलेले शाकिर खान हे त्यांच्या समकालीन पिढीतील एक नावाजलेले सतार वादक असून इटावा घराण्याच्या सर्वात आश्वासक तरुण प्रवर्तकांपैकी एक आहेत तसेच ते त्यांच्या संगीत प्रतिभेच्या वंशपरंपरेतील आठव्या पिढीचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. राष्ट्रीय तसेच आंतरष्ट्रीय अनेक संगीत समारोहातून शाकिर खान यांनी सतार वादनाचे कार्यक्रम सादर केलेले आहेत.

**सोनिक वेलिंगकर(बासरी वादन)**

संगीतमय वातावरणात वाढलेले सोनिक वेलिंगकर यांनी वायाच्या १० व्या वर्षी आपले बासरीवादनाचे प्रथमिक धडे त्यांचे गुरु श्री. मोहन म्हार्दोळकर यांच्याकडून घेतले. त्यांना बेंगळुरु येथील पं. व्यंकटेश गोडखिंडी यांच्याकडून बासरीवादनाचे महत्वाचे धडे घेण्याची संधी मिळाली. त्यानंतर कला अकादमीचे उस्ताद छोटे रहिमत खान यांच्याकडून ही त्यांनी प्रशिक्षण घेतले. सोनिक वेलिंगकर यांना कला अकादमी, पणजी यांनी पुणे येथील पं. राजेंद्र कुलकर्णी यांच्यासोबत उच्च शिक्षण घेण्यासाठीची शिष्यवृत्ती दिली असून सध्या ते त्यांच्या मार्गदर्शनाखाली बासरी शिकत आहेत.

**प्रशांत मल्लीक व श्री. निशांत मल्लीक(धृपद गायन मैफल):-**

डॉ. प्रशांत मल्लिक आणि डॉ. निशांत मल्लिक हे मल्लिक ब्रदर्स या नावने प्रसिध्द असलेल्या दरभंगा धृपद परंपरेशी संबंधित असून ५०० वर्षे जुन्या संगीत वंशाच्या अखंड १३व्या पिढीचे प्रतिनिधित्व करीत आहेत. मल्लिक बंदर्स यांनी त्यांचे वडील धृपद उस्ताद प्रेमकुमार मल्लिक व आजोबा पं. विदुर मल्लिक

यांच्याकडून संगीताचे प्रशिक्षण घेतले. मल्लिक ब्रदर्स हे गौहर बानी आणि खंडार बानी धृपद शैलीचे एक प्रमुख प्रवर्तक असून ते प्राचीन शास्त्रीय संगीत क्षेत्रातील तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार विजेते आहेत तसेच त्यांना अनेक राष्ट्रिय तसेच आंतरष्ट्रिय पुरस्कार आणि सन्मान प्राप्त झालेले आहेत.

**संगीता कट्टी कुलकर्णी(शास्त्रीय गायन):-**

संगीता कट्टी कुलकर्णी या भारतातील कलाकारांच्या तरुण ब्रिगेडमधील प्रमुख हिंदुस्थानी शास्त्रीय गायिका, संगीतकार, पार्श्वगायिका आहेत. त्यांना २००६ मध्ये कर्नाटक सरकारकडून प्रतिष्ठित सुवर्ण कर्नाटक राज्योत्सव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. संगीता यांना तिच्या वडिलांकडून संगीताचे प्रारंभिक धडे मिळाले आणि वयाच्या चौथ्या वर्षी दिग्गज संगीत सम्राट नौशाद अली यांचे आशीर्वाद मिळण्याचे भाग्य तीला लाभले.

संगीता यांनी सरुवातीला श्री शेषगिरी दंडापूर आणि पं. चंद्रशेखर पुराणिकमठ अंतर्गत प्रशिक्षण घेतले व किराणा आणि ग्वाल्हेर घराण्याचे पद्‍मभूषण पं. बसवराज राजगुरु यांच्याकडून सुमारे १२ वर्षे शास्त्रीय गायनाचे आगाऊ प्रशिक्षण घेतले असून त्या सध्या जयपूर-अत्रौली घराण्याच्या पद्‍मविभूषण गानसरस्वती श्रीमती किशोरी आमोणकर यांच्या अधिपत्याखाली आहे. संगीता यांना तिच्या मधुर रचना आणि अल्बमसाठी अनेक गुणवंत पुरस्कार मिळाले आहेत.

**<u>त्रिकुटीजुगलबंदी (तबला ट्रीवो) मैफल</u>**

**पं. योगेश साम्सी:-**

पं. योगेश साम्सी हे प्रख्यात गायक पं. दिनकर कैकिणी यांचे सुपुत्र असून त्यांनी सुरुवातीचे प्रशिक्षण त्यांच्या वडीलांकडून घेतले आणि नंतर पं. एच. तारानाथ राव यांच्याकडून घेतले. प्रख्यात तालवादक उस्ताद अल्लारखा खान यांच्याकडून २३ वर्षे मार्गदर्शक घेतले. पं. साम्सी यांने भारतातील अव्वल दर्जाचे वादक, गायक आणि नर्तक यांना साथ दिली आहे. पं. साम्सी यांनी भारतात आणि परदेशातही अनेक परफॉर्मन्स सादर केले आहेत. त्यांनी भारत, यू.एस.ए., यू.के., दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि जपानमधील जागतिक संगीत केंद्रांमध्ये यशस्वी कार्यशाळाही घेतल्या आहेत.

**स्वप्नील भिसे:-**

स्वप्नील सतीश भिसे हे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील एक आश्वासक तबला वादक असून त्यांने वयाच्या तिस-या वर्षी सद्‍गुरु श्री. चंद्रकांत भोसेकर यांच्याकडून संगीताचे प्रारंभिक धडे घेतले. त्यानंतर अवघे १० वर्षे ललियाना आणि दिल्ली घराण्याचे गुरु श्री प्रवीण करकरे यांच्याकडून घेतले. गेल्या १७ वर्षापासून ते तबलावादक आणि गुरु पं. योगेश साम्सी यांच्याकडून तालीम घेत आहे. स्वप्नील भिसे यांनी अनेक राष्ट्रिय संगीत समारोहातून कार्यक्रम सादर केलेले आहेत तसेच पं. व्हि.डी. पलुस्कर पुरस्कार, पं. नंदन मेहता पुरस्कार, पं. कंठे

महाराज पुरस्कार तसेच त्यांनी सलग दोन वर्षे ए. एल. यू. व्दारे आयोजित आंतरविद्यापीठात सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

**चंद्रशेखर गांधी:-**

संगीताने समृध्द कुटुंबात जन्मलेल्या चंद्रशेखर गांधी यांनी वायाच्या चौथ्या वर्षापासून तबलावादनाची सुरुवात केली. त्यांचे वडील आणि गुरु श्री रवी गांधी हे एक प्रसिध्द तबलावादक असून तबला क्षेत्रातील सर्वात ज्येष्ठ सदस्यांपैकी एक आहेत. चंद्रशेखर यांना महान तबलावादक पं. पंढरीनाथ नागेशकरजी आणि पं. राजेंद्र अंतरकरजी यांच्याकडून शिकण्याचे भाग्य लाभले असून सध्या ते योगेश साम्सी यांच्या मार्गदर्शनाखाली शिकत आहे. चंद्रशेखर हे तबलावादनातील आव्हानात्मक कलाकार म्हणून ओळखले जातात.

**नितेश सावंत(शास्त्रीय गायन):-**

नितेश सावंत यांनी श्री प्रकाश कोरगांवकर, श्री नितीन शिरगावकर, श्री नाना शिरगांवकर आणि श्री बाळकृष्ण केळकर यांच्याकडून संगीताचे प्रारंभिक प्रशिक्षण घेतले. त्यांनी २००८ मध्ये गोवा कॉलेज ऑफ म्युझिक आल्तिनो-पणजी येथे बॅचलर ऑफ परफॉर्मिंग आर्ट (BPA) आणि मास्टर ऑफ परफॉर्मिंग आर्ट (MPA) पूर्ण केले. त्यांनी अलंकार पूर्णही गांधर्व महाविद्यालयातून प्रथम श्रेणीसह पूर्ण केले आहे. नितेश यांनी संगीत विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर नितेश यांनी गोवा संगीत महाविद्यालयात व्याख्याता म्हणून कार्यरत आहे. तसेच ते ऑल इंडिया रेडियोचा बी हाय ग्रेड कलाकार आहे.

**पं. देबासिश भट्टाचार्या(सरोद वादन):-**

पं. देबासिश भट्टाचार्या यांनी आपल्या लहान वयात संगीतातील प्राथमिक धडे त्यांचे वडील प्रख्यात सतारवादक स्व. शामसुंदर भट्टाचार्या यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले. त्यानंतर संगीताचार्य राधिका मोहन मैत्र यांचे शिष्य पं. रवी लाहा यांच्याकडून त्यांनी अनेक वर्षे प्रशिक्षण घेतले असून सध्या ते १९८१ पासून पद्मभूषण पं. बुध्ददेव दासगुप्ता यांच्याकडून विस्तृत तालीम घेत आहेत. कठोर परिश्रम आणि प्रामाणिक कार्याच्या जोरावर देबासिश यांने देशातील अग्रगण्य सरोदियांमध्ये स्वताचे स्थान निर्माण केले आहे. उस्ताद मुराद अली, उस्ताद अब्दुल्ला खान, मोहम्मद अमीर खान आणि त्यांच्या प्रसिध्द शिष्य संगीताचार्य राधिका मोहन मैत्र यांच्यापासून विकसित झालेल्या सेनिया शाहजहांपूर घराण्याचे ते खरे मशालवाहक आहेत.

**मंजिरी असानारे केळकर(शास्त्रीय गायन):-**

मंजिरी असानारे केळकर यांचा जन्म पारंपारिक संगीत घराण्यात झाला. त्यांचे वडील आनंद असानारे हे प्रसिध्द तबला कलाकार होते. मंजिरी यांनी शास्त्रीय गायन संगीताचे मूलभूत धडे पं. सी. टी. म्हैसकर, जयपूर अत्रौली घराण्याचे स्व. पं. एम. एस. कानेटकर व दिवंगत उस्ताद भुर्जीखाँ साहेबांचे यांचे सुप्रसिध्द शिष्य गंडाबंध शागीर्द यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले. त्यांनी अनेक राष्ट्रिय तसेच आंतरराष्ट्रीय संगीत समारोहातून कार्यक्रम सादर केलेले आहेत.

**प्रसाद खापर्डे(शास्त्रीय गायन):-**

प्रसाद खापर्डे हे रामपूर सहसवान घराण्याचे उस्ताद रशीद खान यांचे ज्येष्ठ शिष्य आहेत. जे आज भारतातील सर्वोच्च गायकांपैकी एक असून ते कोलकात्याच्या प्रसिध्द संगीत संशोधन अकादमीचे अभ्यासक आहे. प्रसाद खापर्डे यांचा जन्म संगीतप्रेमी शिक्षणतंज्ञांच्या कुटुंबात झाला. त्यांचे संगीताचे प्रारंभिक प्रशिक्षण प्रख्यात गुरु श्री. भालेराव व पं. डी. व्ही. यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. प्रसाद खापर्डे यांनी कला अकादमी गोवा येथे प्राध्यापक म्हणून काम केल आहे. आतापर्यंत अनेक पुरस्कार त्यांनी प्राप्त केले आहेत.

**ज्योती हेगडे(रुद्रवीणा वादन):-**

विदुषी ज्योती हेगडे या खंडारबानी घराण्यातील रुद्रवीणा आणि सतार वादनातील कलाकार आहेत. त्या रुद्रवीणावादनातील जगातील पहिल्या प्रसिध्द महिला कलाकार आहे. तिची शैली मुख्यत्वे उस्ताद असद अली खान यांच्या खंडारबानी घराण्याची आहे. विदुषी ज्योती हेगडे यांनी हिमालयन युनिव्हर्सल ट्रस्ट अंतर्गत श्री स्वामी रामा वीणाग्रामची स्थापना केली. हे पारंपारिक गुरुकुल पध्दतीचे समकालीन मॉडेल आहे, जेथे विदुषी ज्योती हेगडे यांच्याकडून रुद्रवीणा आणि सतार शिकण्यासाठी जगभरातून शिष्य येतात.

**पं. अजय चक्रवर्ती(शास्त्रीय गायन):-**

पं. अजय चक्रवर्ती हे एक भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय गायक, संगीतकार, गीतकार आणि पटियाला-कसूर घराण्याचे गुरु आहेत. ते भारतीय शास्त्रीय संगीतातील नामवंत व्यक्तिमत्वांपैकी एक मानले जातात. त्यांना २०२० मध्ये भारतातील तिसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मभूषण पुरस्काररासह विविध पुरस्कार आणि सन्मानांचे विजेते आहेत.

या संगीत महोत्सवात पं. योगेश साम्सी, ओजस आधिया, दयानिधेश कोसंबे, उदय कुलकर्णी, मयांक बेडेकर, अमर मोपकर, स्वप्निल मांद्रेकर, ऋषिकेश फडके, महेश वझे हे कलाकार तबल्यावर साथसंगत करतील तर पं. अजय जोगळेकर, राया कोरगांवकर, सुभाष फातार्फेकर, गुरुप्रसाद गांधी, दत्तराज सुर्लकर, प्रसाद गावस, दत्तराज म्हाळशी यांची संवादिनी साथसंगत लाभणार आहे. तसेच मृणाल मोहन उपाध्याय, पं. ज्ञानेश्वर देशमुख हे कलाकार पखवाजावर साथसंगत करणार आहेत.

यंदाच्या या महोत्सवासाठी राजीव गांधी कला मंदिर, फोंडा यांचे आयोजनासाठी सहकार्य लाभले आहे.

महोत्सवातील कार्यक्रम सर्व रसिकांसाठी खुले असून कांही आसन व्यवस्था निमंत्रितासाठी राखून ठेवण्यात आली आहे. याची सर्व रसिकांनी नोंद घ्यावी व यंदाचा हा संगीत समारोह सर्वार्थाने यशस्वी करावा असे आवाहन कला अकादमीने केले आहे. कोविड-१९ ची सर्व मार्गदर्शक तत्वे पाळून या समारोहास प्रवेश दिला जाणार आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

सोबतः प्रमुख कलाकारांची प्रसिध्दीसाठी छायाचित्रे

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)